।। अंतरी पेटवू ज्ञानज्योत ।।

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव

विचारधारा प्रशाळे अंतर्गत

**महात्मा गांधी अध्ययन व संशोधन केंद्र**

दि. १०/१०/२०१३

## गांधी सप्ताह - २०१३

(दि. ०२ ऑक्टोबर ते ०८ ऑक्टोबर)

माननीय कुलगुरू महोदयांच्या दि. १७/०९/२०१३ च्या मान्यतेनुसार **गांधी सप्ताह - २०१३** खालीलप्रमाणे साजरा करण्यात आला त्याचा वृत्तांत पुढील प्रमाणे सविनय सादर करीत आहोत.

### दि.०२ ऑक्टोबर २०१३ रोजी महात्मा गांधी टेकडीवर भजनांचा कार्यक्रम :-

दि.०२ ऑक्टोबर २०१३ रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त विद्यापीठाच्या गांधी टेकडीवर भजनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सुरवातीला प्रास्तविक करतांना डॉ.अनिल चिकाटे यांनी ०२ ऑक्टोबर हा दिवस जागतिक पातळीवर अहिंसा दिन म्हणून सर्वत्र पाळला जातो असे सांगितले याच अनुषंगाने भजनांचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे असे सांगितले; यानंतर माननीय कुलगुरू प्रा.डॉ.सुधीरजी मेश्राम सर यांच्या शुभहस्ते महात्मा गांधी यांच्या पुतळ्यास व प्रतिमेस पुष्प अर्पण करण्यात आले त्याचप्रमाणे माननीय कुलसचिव प्रा.डॉ.महाजन यांनीही महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण केले. त्यानंतर विद्यापीठाच्या संगीत विभागाचे प्रमुख मा.प्रा.संजय पत्की आणि त्यांच्या समुहाने महात्मा गांधी यांच्या एकूणच जीवन पध्दती व सत्याग्रह यांच्यावर आधारित प्रसिध्द गीतरचना सकाळी ०८.०० ते ०९.०० या वेळेत प्रस्तुत केल्यात. या कार्यक्रमास प्रा.डॉ. सौ.ज्योत्सना मेश्राम मॅडम, प्रा.डॉ.माहूलीकर, संचालक स्कुल ऑफ केमिकल सायन्सेस, विद्यापीठ ग्रंथपाल डॉ.टि.आर.बोरसे, प्रा.भालसिंगे मॅडम, प्रा.खिराडे, प्रा.आर.आर.चव्हाण, जनसंपर्क अधिकारी श्री सुनील पाटील, उपकुलसचिव श्री अरुण पाटील, इतर प्राध्यापक व शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी आणि प्रतिष्ठीत नागरिक, विद्यार्थी-विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यात प्रामुख्याने विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक, अधिकारी व विद्यार्थी उपस्थित होते.

### दि. ०३ ऑक्टोबर २०१३ रोजी व्याख्यानाचा कार्यक्रम :-

दि.०३ ऑक्टोबर रोजी सकाळी ११.०० ते १२.३० या वेळेत विद्यापीठाच्या अधिसभागृहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. **"गांधीजींचे सत्याग्रह आणि आजची तरुण पिढी"** या विषयावर डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथील जनसंवाद व वृत्तपत्र विद्या विभागाचे प्रा.जयदेव डोळे, यांनी सदर विषयावर अत्यंत गंभीरतेने विद्यार्थ्यांपुढे प्रबोधन केले. **सत्याग्रह हे आत्मबहल देणारे तंत्र आहे. बुध्द, महावीर**

**यांनी अहिंसेचाच मार्ग अवलबिंलेला होता मात्र महात्मा गांधी यांनी याच अहिंसेचा मार्ग अधिक प्रभावीपणे प्रत्यक्ष कृतीने जगापुढे मांडले असेही त्यांनी आपल्या प्रबोधनात सांगितले.** या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मा.कुलसचिव प्रा.डॉ.ए.एम.महाजन व स्कुल ऑफ थॉटसृचे संचालक प्रा.डॉ.अनिल डोंगरे उपस्थित होते. सुरुवातीला जनसंपर्क अधिकारी श्री सुनील पाटील यांनी प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय करून दिला. या कार्यक्रमास प्रा.डॉ. शोभा शिंदे, प्रा.डॉ.तुकाराम दौड, प्रा.गेडाम व इतर शिक्षक व शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी त्याचप्रमाणे मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. शेवटी महात्मा गांधी अध्ययन व संशोधन केंद्राचे प्रभारी प्रमुख डॉ.अनिल चिकाटे यांनी पाहुण्यांचे, अध्यक्षांचे, उपस्थितांचे सोबतच प्रत्यक्ष अप्रत्यक्ष ज्यांनी या कार्यक्रमास सहकार्य केले त्या सर्वांचे आभार व्यक्त केले.

### दि.०४ ऑक्टोबर २०१३ रोजी व्यक्तिमत्व विकास शिबीराचे आयोजन :-

विद्यापीठाचे महात्मा गांधी तत्त्वज्ञान केंद्र, धुळे येथे सकाळी १०.०० ते संध्याकाळी ०५.०० वाजेदरम्यान एकदिवसीय व्यक्तिमत्व विकास शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. सुरवातीस व्यक्तिमत्व विकास शिबीराचे उद्‌घाटन, उदघाटक प्रा.संजय सोनवणे यांनी दिप प्रज्वलन करुन केले. या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून प्रा.डॉ.शिवाजी देवरे, व्यवस्थापन परिषद सदस्य, प्रमुख पाहुणे म्हणून सिनेट सदस्य, प्रा.अतुल कदमबांडे व डॉ.अनिल चिकाटे उपस्थित होते, या शिबीराचे प्रास्ताविक प्रा.डॉ.संजय ढोडरे यांनी केले तर सुत्र संचालन प्रा.अरुण पाटील यांनी केले. या पूर्ण एकदिवसीय शिबीरात गांधी विचारवंत प्रा.बी.व्ही.मोरे यांनी **ताणतणाव व आजचा युवक** या विषयावर मार्गदर्शन केले त्याचप्रमाणे डॉ.चौबे यांनी **मुल्य शिक्षण व युवक** आणि शेवटी प्रा.रुपेश पाटील यांनी **एन.एस.एस. व युवकांचा सहभाग** यावर मार्गदर्शन केले. व्यक्तिमत्व विकास शिबीराच्या समारोपात अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. वाय.एच सनेर व उपप्रार्चार्य डॉ.बी.के.पाटील उपस्थित होते. यावेळेस त्यांनी विद्यार्थ्यांना गांधीच्या विचारांच्या पथपावलांनवर चालण्याचा संदेश दिला व भावी जीवनात यशस्वी व्हावेत म्हणून शुभेच्छा दिल्यात. या एकदिवसीय व्यक्तिमत्व विकास शिबीरात धुळे येथील विविध महाविद्यालयातील ६० विद्यार्थ्यांनी लाभ घेतला. या एक दिवसीय शिबीराची संपूर्ण जबाबदारी केंद्राचे कार्यकारी संचालक प्रा.डॉ.संजय ढोडरे यांनी यशस्वीरित्या पार पाडली. शेवटी डॉ.अनिल चिकाटे यांनी उपस्थित सर्व विद्यार्थ्यांचे तसेच सनमाननीय वक्ते, महात्मा गांधी तत्वज्ञान केंद्र, धुळे येथील कार्यकारी संचालक प्रा.डॉ.संजय ढोडरे व इतर सर्व कार्यालयीन कर्मचारी आणि हे शिबीर यशस्वी होण्यासाठी ज्यांनी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे मदत केली त्या सर्वांचे आभार व्यक्त केले.

### दि.०५ ऑक्टोबर २०१३ रोजी रक्तदान शिबीर :-

जिल्हा सरकारी रुग्णालय, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठाच्या मध्यवर्ती ग्रंथालयात **रक्तदान शिबीराचे** आयोजन करण्यात आले होते. यात विद्यापीठाच्या विविध विभागातील २८ विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन रक्तदान केले. सुरुवातीला विद्यापीठाच्या वतीने माननीय प्रा.डॉ.ए.एम.महाजन, कुलसचिव यांनी जिल्हा सरकारी

रुग्णालयाच्या डॉ.बी.पी.बारेला आणि त्यांचे सहयोगी एच.एस.पाटील व सोबत आलेले इतर सहकारी यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले त्याचप्रमाणे उपस्थित विद्यार्थ्यांना व कर्मचाऱ्यांना रक्तदानाचे महत्तव सांगितले. हे शिबिर सकाळी १०.०० ते दुपारी ०२.०० वाजेपर्यंत चालले असून यात राष्ट्रीय सेवा योजना विद्यापीठ एककचे व इतर विभागाच्या विद्यार्थ्यांनी रक्तदानास सहकार्य केले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मध्यवर्ती ग्रंथालयाचे कर्मचारी यांचा सहभाग लाभला.

**दि. ०६ ऑक्टोबर २०१३ रोजी चित्रकला स्पर्धा :- गांधी जीवन - सत्याग्रह**

नंदुरबार येथील विद्यापीठाच्या एकलव्य प्रशिक्षण केंद्र येथे सकाळी १०.०० ते दुपारी ०३.०० या वेळेत **गांधी जीवन - सत्याग्रह** या विषयाला अनुसरून चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सदर स्पर्धेत नंदुरबार परिसरातील शालेय विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. चित्रकला स्पर्धेचे उदघाटन ज्येष्ठ गांधीवादी-विचारवंत प्रा.यशवंत स्वर्गे यांच्या शुभहस्ते झाले या प्रसंगी त्यांनी विद्यार्थ्यांना महात्मा गांधीच्या शालेय जीवनातील बऱ्याच प्रसंगाची माहिती देऊन गांधीजी पुढे कसे महात्मा झाले व ते भारताचे राष्ट्रपिता कसे झाले याची माहिती दिली या कार्यक्रमास विद्यापीठाचे उपकुलसचिव आर.जे.वळवी आणि मान्यवर नागरिक उपस्थित होते. या स्पर्धेत ायोजकांतर्फे सहभागी स्पर्धकांना चित्रकलेसाठी पेपर व इतर साहित्य पुरविण्यात आले होते, तसेच स्पर्धकांना अल्पोहार देण्यात आला होता. या स्पर्धेची संपूर्ण जबाबदारी नंदुरबार येथील एकलव्य प्रशिक्षण केंद्रामधील स्पर्धा परिक्षा केंद्राचे समन्वयक श्री विरेंद्र वळवी, कार्यालयीन कर्मचारी भिमसेन वळवी, शिवाजी पवार यांनी स्पर्धा यशस्वी होण्यास परिश्रम घेतले. या स्पर्धेत एकुण ७० विद्यार्थ्यांचा सहभाग लाभला असून निवड समितीने प्रथम निनाद पी बेहेरे, व्दितीय दिपेश लतीश पटेल व तृतीय प्राची लतेश पटेल या विद्यार्थ्यांची त्याच प्रमाणे उत्तजनार्थ म्हणून दिपीका प्रविण जैन व योगेश मगन वळवी यांची  निवड केली. यात इतर विद्यार्थी व पालक त्याचप्रमाणे सन्माननिय नागरिकांचा सहभाग लाभला.

**दि.०७ ऑक्टोबर  २०१३ श्रमदान शिबीर, प्रताप तत्त्वज्ञान केंद्र, अमळनेर :-**

अमळनेर येथील प्रताप तत्त्वज्ञान केंद्र येथे एक दिवसीय श्रमदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. सदर श्रमदान शिबिरात अमळनेर परिसरातील महाविद्यालयांचा सहभाग मिळाला असून यात जवळ-जवळ २५० विद्यार्थ्यांनी उत्साहाने भाग घेतला होता. यावेळेस अमळनेर येथील विविध महाविद्यालयाचे एन.एस.एस. विभागाचे समन्वयक उपस्थित होते जसे डॉ.निसार पटेल, प्रा.डी.आर.चौधरी, प्रा. नलीनी पाटील, प्रा.मिनाक्षी पाटील प्रा. संदीप नेरकर, प्रा.संजय पाटील, प्रा.तोरवणे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. या शिबीरात धनदाई महाविद्यालय, अमळनेर, नेहरु समाजकार्य महाविद्यालय, अमळनेर व प्रताप महाविद्यालय, अमळनेर या महाविद्यालयांनी  सहभाग घेतला होता. सुरवातीस विद्यार्थ्यांनी प्रताप तत्वज्ञान केंद्राच्या परिसरातील गवत काढून परिसर स्वच्छ केला या नंतर प्रताप महाविद्याल्याच्या विद्यार्थी-विद्यार्थीनी  **व्यसन मुक्ती व अंधश्रध्दा** या दोन विषयावर पथनाटय सादर केलीत. यानंतर श्रमदान शिबीरात सहभागी झालेल्यांना अल्पोहार देण्यात आला. हे एकदिवसीय श्रमदान शिबीर यशस्वी करण्यासाठी

प्रताप तत्वज्ञान केंद्रातील सर्व कर्मचारी, प्रा.डॉ.चौधरी यांनी परिश्रम घेतले शेवटी डॉ.अनिल चिकाटे यांनी सर्व समन्वयकांचे, सहभागी विद्यार्थ्यांचे व प्रताप तत्वज्ञान केंद्रातील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे आभार मानले.

**दि.०८ ऑक्टोबर २०१३ रोजी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजनः-**

या गांधी सप्ताहाच्या शेवटच्या दिवसी विद्यापीठाच्या प्रशाळेतील विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते या स्पर्धेचा विषय **"गांधीजींचा अहिंसावाद आणि आजचा दहशतवाद"** असा ठेवण्यात आला होता. या स्पर्धेत विद्यार्थ्यांकडून मोठा प्रतिसाद मिळाला. या वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन दुपारी ०२.०० ते ०५.०० या वेळेत सामाजिक व मानव्यशास्त्रे प्रशाळेच्या सभागृहात करण्यात आले होते. या स्पर्धेस लाईफ सायन्सेस प्रशाळेच्या प्रा.डॉ.संजीवनी भालसिंग व शिक्षणशास्त्र प्रशाळेच्या प्रा.डॉ.मनिषा इंदाणी परीक्षक म्हणून लाभले होते. स्पर्धेच्या सुरुवातीस विविध विचारधारा प्रशाळेचे प्रभारी संचालक प्रा.डॉ. अनिल डोंगरे यांनी दोन्ही परीक्षकांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले आणि सदर स्पर्धेत सहभाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. त्याचप्रमाणे आयोजक डॉ.अनिल चिकाटे यांनी स्पर्धेची प्रस्तावना, विषयाची मांडणीसबंधीच्या सूचना व नियम आणि वेळ आदी विद्यार्थ्यांना समजून सांगितले. स्पर्धेअंती दोन्ही परीक्षकांच्या निर्णयानुसार प्रथम संदिप रविंद्र पाटील, व्दितीय तुषार शंकर सुर्यवंशी व तृतीय लक्ष्मण बाळू पाटील आणि उत्तेजनार्थ प्रविण किशन दांडगे व धनराज इंगळे यांची निवड केली.

उपरोक्त **गांधी सप्ताह** साजरा करण्यास माननीय कुलगुरू महोदयांचे व माननीय कुलसचिव महोदयांचे बहमोल असे मार्गदर्शन व सहकार्य लाभले असून विद्यापीठातील अधिकारी कर्मचारी, मध्यवर्ती ग्रंथालयातील ग्रंथपाल डॉ.बोरसे व कर्मचारी, सामाजिक व मानव्यशास्त्रे प्रशाळेचे संचालक प्रा.डॉ.गुप्ता, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, महात्मा गांधी अध्यासन व संशोधन केंद्रातील कर्मचारी, राष्ट्रीय सेवा योजनाचे समन्वयक, अधिकारी आणि विद्यार्थी त्याप्रमाणे प्रा.डॉ.पी.एस.नन्नवरे, संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग, जळगाव, विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी श्री सुनिल पाटील व त्या-त्या केंद्रातील कर्मचारी या सर्वांचे सकारात्मक सहकार्य लाभले.

**(डॉ. अनिल एन. चिकाटे)**
**प्रभारी प्रमुख,**
महात्मा गांधी अध्ययन
व संशोधन केंद्र,
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव